**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९३८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. अंगद नरहरीराव भोसले<br>द्वारा श्री. पवार, रा. सर्व्हे नं.५३/५८,<br>साईनाथनगर, वडगावशेरी, पुणे-१४ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | ज्येष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. अंगद नरहरीराव भोसले यांनी जन माहिती अधिकारी तथा ज्येष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, लोणी काळभोर, यांच्याकडे दि.१३.३.२००७ रोजीच्या अर्जान्वये सन २००५ ते २००६ मधील ३० टक्के कोट्यातील शेवटच्या प्रवेश फेरीची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी व अपीलकर्त्यांचे माहिती संबंधित एजन्सीकडून प्राप्त करून घेण्यावर एकमत झाले. २० दिवसात माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी संमती दिली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. अपीलकर्त्यास माहिती दिल्याबाबत अहवाल जन माहिती अधिकारी यांनी दहा दिवसाचे आत आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि.** २३ .९.२००८

(स्वाक्षरी)
**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंड

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९३९ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. अंगद नरहरीराव भोसले<br>द्वारा श्री. पवार, रा. सर्व्हे नं.५३/५८,<br>साईनाथनगर, वडगावशेरी, पुणे-१४ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | ज्येष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. अंगद नरहरीराव भोसले यांनी जन माहिती अधिकारी तथा ज्येष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, लोणी काळभोर, यांच्याकडे दि. २०.२.२००७ रोजीच्या अर्जान्वये सन २००४ ते २००६ या कालावधीतील सामाजिक आरक्षणातील प्रवेशाची माहिती मागितली होती. अपीलकर्त्याने माहिती मिळाल्याचे लेखी मान्य केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** २३.९.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.८.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपील-कर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९६० / सोलापूर | श्री. दत्तात्रय नरहर पोतदार मु.पो.दत्तछाया, नाईकवाडी, प्लॉट, उपळाई रोड, ता.बार्शी, जि. सोलापूर | उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर | कै. विठ्ठलराव जी.शिंदे विद्यालय, टेंभुर्णी, ता.माढा, यांच्या दि.२०.४.२००७ रोजीच्या तक्रार अर्जासंबंधी चौकशी अहवाल, आवक नोंद, कार्यालयीन टिप्पणी दिनांकासह प्रत | माहिती 'अपील निर्गत कार्यक्रमा' दिवशी मिळाल्याचे अपीलकर्त्याने लेखी नमूद केले. |
| २ | ७३७ / सोलापूर | श्री. रमेश काशिनाथ आवताडे मु.पो. बारलोणी, ता. माढा, जि. सोलापूर | प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालय (बी.एड.) वडाळा, ता.उत्तर सोलापूर, जि. सोलापूर | कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | कुमुदिनी नागनाथ नवले महाविद्यालयात बी.एड. अथवा अन्य अभ्यासक्रम शिकत आहे काय ? तिने घेतलेला प्रवेश दिनांक, सध्याचा व कायमचा पत्ता, तसेच प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे नाव व पत्ता इत्यादी माहिती | अपीलकर्त्याच्या मूळ अर्जानुसार माहिती रजिस्टर पोष्टाने पाठविली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद करून पोच पावती व पाठविलेली माहिती निवेदनासोबत सादर केली. |
| ३ | ८८० / सोलापूर | श्री. संभाजी नागू इंगळे मु.पो. गणेशवाडी, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत गणेशवाडी, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मंगळवेढा, जि. सोलापूर | मार्च २००६ ते नोव्हेंबर २००७ मध्ये शौचालय अनुदान, ११ व १२ व्या वित्त आयोगाच्या खर्चाची माहिती व सरपंच, ग्रामपंचायत बँक खाते, पास बुक झेरॉक्स प्रत | तीनही घटकां मधील चर्चेत माहिती बाबत एकमत झाल्याचे निवेदनात नमूद केले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ९८२ / सोलापूर | श्री. दिलीप सुब्राव शेरखाने मु.पो. राळेरास, ता. बार्शी, जि.सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत राळेरास, ता. बार्शी, जि.सोलापूर | विस्तार अधिकारी (आरोग्य), पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर | सन २००६.०७ अंदाजपत्रक प्रत, मंजूर रक्कम किती, लोक वर्गणी कोणी व किती भरली, काम पूर्ण झाल्याचा दाखला, पाईप लाईन कामाची रक्कम, इतर कामा साठी कोणत्या नियमाने वापरली त्याची प्रत, रक्कम ठेकेदारास न देण्याचे कारण इत्यादी | जन माहिती अधिकारी यांनी माहिती अपीलकर्त्यास पोस्टाने पाठविली. परंतु अपीलकर्त्याने टपाल स्वीकारले नाही. अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून सदर माहिती अपीलकर्त्याने स्वीकारली असल्याची पोच निवेदनासोबत सादर केली. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. ३१ .१०.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि.२४.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६७ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. मधुकर गोपीनाथ नाईक,<br>रा.२२ बुधवार पेठ, अप्पा बळवंत चौक,<br>पुणे ४११ ००२ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, वडगांव मावळ .<br>ता. मावळ, जि. पुणे | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार,<br>, ता. मावळ, जि. पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. मधुकर गोपीनाथ नाईक यांनी दि.१६.०७.२००७ च्या अर्जान्वये मौजे कुसगाव,ब ता.मावळ येथील गट क्र.४१७ चे खरेदीदस्त क्र. ३०९४/९६, दि.०९.०७.१९९६ ची सत्य प्रत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार यांच्याकडे मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरची बाब / माहिती ही दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने तसे अपीलकर्त्यास कळविले आहे. ५ दिवसात अर्ज त्या कार्यालयाकडे पाठविला नाही.

चुकीच्या जन माहिती अधिकाऱ्याकडे अपीलकर्त्याने माहिती मागितली होती. तथापि दुय्यम निबंधक कार्यालयाकडून खरेदीखताची सत्यप्रत मिळाली असून तक्रार राहिली नाही, असे श्री. नाईक यांनी दि.१२.०६.२००८ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. त्यापूर्वी दि.२५.०६.२००७ रोजी त्यांनी अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांना अपील निकाली काढण्याबाबत कळविले होते. तरीही दि.१६.०६.२००७ रोजी श्री.नाईक यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. त्यावरील, तसेच मूळ अर्जातील सही व श्री.नाईक यांच्या अन्य पत्रव्यवहारातील सही यात तफावत आहे. अपील

अर्जातील सही आपल्यातर्फे करण्यात आल्याचे श्री.नाईक यांनी सह जिल्हा निबंधक वर्ग -१ यांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे. तक्रार दूर झालेली असताना त्यानंतर अपील करणे, तसेच आपल्या वतीने अन्य व्यक्तीला आपली स्वाक्षरी करु देणे आक्षेपार्ह आहे. एका अर्थी आयोगाची व अन्य यंत्रणांची फसवणूक करण्याचा हा प्रकार आहे. आयोग त्याची गंभीर दखल घेत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१.अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. तक्रार राहिलेली नसताना अपील करणे व अन्य व्यक्तीने अपीलकर्त्याच्या नावे सही करणे या गंभीर गैरप्रकाराबाबत अपीलकर्ता श्री.नाईक यांनी आपला खुलासा दि.२७.०९.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा. त्यानंतर त्यांच्यावरील कायदेशीर कारवाईबाबत निर्णय करण्यात येईल.

पुणे
दि. १६/०९/२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २४.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | डॉ. श्रीपाद कृष्ण इनामदार<br>डॉ. इनामदार एक्सरे क्लिनिक, अक्षय सोसायटी,<br>विशाल थिएटर समोर, पिंपरी, पुणे-४११ ०१८ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, करमाळा,<br>ता. करमाळा, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक, भूमि अभिलेख, जि. सोलापूर | हजर |

गावासाठी अंतर्गत रस्ते निर्माण करताना आवश्यक जमिनी संपादन करण्याची शासनाची अधिकृत प्रक्रियेनुसार करण्यात येणारी कार्यवाही व त्यामुळे होणाऱ्या बदलाविषयीच्या भूमि अभिलेखांची (नकाशांची ) मागणी अपीलकर्ता डॉ. श्रीपाद कृष्ण इनामदार यांनी केली होती. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, करमाळा यांनी माहिती देण्यात आल्याचे नमूद केले. मात्र अपीलकर्त्याशी समक्ष केलेल्या चर्चेनुसार माहितीबाबतची संदिग्धता दूर झाली, असे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. एका मुद्दयाच्या माहितीसाठी अपीलकर्त्याने स्वतंत्र अर्ज करावा व त्यानुसार माहिती द्यावी, असा तीनही घटकांमधील चर्चेत निर्णय झाला. सदरची माहिती १५ दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. चर्चेतील निर्णयानुसार माहिती दिल्याबाबतचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, करमाळा, जि. सोलापूर यांनी हा आदेश मिळाल्यापासून आठ दिवसात आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि. १६ .९.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त [illegible]ती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक २७.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६९ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.किशोर टी भिडे<br>सर्व्हे नं.४७,प्लॉट नं.९०२,<br>वार्ड नं.३,सुनितानगर,<br>वडगावशेरी, पुणे-१४ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप कार्यकारी अभियंता,<br>कुकडी पाटबंधारे प्रकल्प विभाग क्र. १,<br>नारायणगाव, जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | कार्यकारी अभियंता,<br>लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे -११ | हजर |

कुकडी पाटबंधारे प्रकल्प विभाग, क्रमांक १ यांच्या कक्षेत सन २००५ ते २००७ या कालावधीतील काढलेल्या निविदा, सदर कामांची देयके, इत्यादी संबंधी ७ मुद्यांची विस्तृत माहिती अपीलकर्ता श्री.किशोर टी.भिडे यांनी जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,शासकीय माहिती अधिकारी कुकडी पाटबंधारे प्रकल्प विभाग, क्रमांक १, नारायणगाव, जि.पुणे यांच्याकडे मागितली होती. श्री.भिडे यांचा अर्ज दि.०४.०४.२००७ रोजी प्राप्त झाला. दि.०५.०४.२००७ रोजी शुल्क भरण्याबाबत त्यांना कळविले. त्यांनी शुल्क न भरल्याने माहिती अद्यापही दिलेली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,शासकीय माहिती अधिकारी कुकडी पाटबंधारे प्रकल्प विभाग क्र.१, नारायणगाव, जि.पुणे यांनी स्पष्ट केले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी यांनीही अपील निर्णय दिला आहे. तथापि मध्यंतरीच्या काळात संपर्क साधून दि.०१.०१.२००८ रोजी माहिती प्राप्त झाली असून

संपूर्ण माहिती समक्ष कार्यालयात पहावयास मिळाली व अपील खारिज करावे, असे लेखी निवेदन श्री.भिडे यांनी दिले आहे. त्याची छायांकित प्रत जन माहिती अधिकारी यांनी सादर केली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : २४-०९-२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.चंद्रशेखर मुकुंद शाळू
४/७७, शिवाजी चौक, मु.पो.ता.दौंड, जि.पुणे ४१३८०१ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
(१) जिल्हाधिकारी, पुणे — उत्तरवादी
(२) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१९,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९७+३१५ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.चंद्रशेखर मुकुंद शाळू
४/७७, शिवाजी चौक, मु.पो.ता.दौंड, जि.पुणे ४१३८०१

**अपिलीय प्राधिकारी** तथा
(१) जिल्हाधिकारी, पुणे प्रतिनिधी श्री.चिंतामणी जोशी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१९,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती वैशाली इंद्राणी ऊंटवाल

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.९.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.९.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.९.२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.७ यांचे ॲवॉर्ड क्र.एलअेक्यू:७/एसआर/२/७०, तारीख १५.१०.१९७४ स्टेटमेंट अे अ.क्र.८ मध्ये मूळ जमीन मालक गोदुबाई दत्तात्रय शाळुऐवजी कुळ श्री.गुलाब दगडोबा जगदाळे यांचे नांव ज्या कायदा कलमाखाली लागले त्याची माहिती. | |

## विवेचन

मौजे दौंड, ता.दौंड, जि.पुणे येथील संपादित जमिनीला कबजेदार सदरी लागलेल्या नावाबाबतची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांकडून आपल्याला मिळाली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१९ यांच्याविरुध्द जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील दाखल केल्याचे अपीलकर्ता श्री.चंद्रशेखर मुकुंद शाळू यांनी म्हटले असले तरी असे अपील दाखल झालेले नाही, असे तत्कालीन जिल्हाधिकारी, पुणे श्री.प्रभाकर देशमुख यांनी दि.१८.३.२००८ च्या पत्रान्वये राज्य माहिती आयोगाला कळविले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे, सर्वसाधारण शाखा यांच्याशी संपर्क साधून माहिती घेण्याबाबत दि.२०.१२.२००७ च्या पत्रान्वये श्री.शाळू यांना कळविले होते. त्यांनी संपर्क न साधल्यामुळे पुन्हा दि.१५.३.२००८ रोजी त्यांना तसे पत्र पाठविण्यात आले, असेही श्री.देशमुख यांनी निवेदनात नमूद केले आहे.

कुळाचे नांव कायद्याच्या कोणत्या कलमान्वये लावले, याची माहिती श्री.शाळू यांनी मागितली होती. परंतु त्याबाबतचा तपशील जन माहिती अधिकाऱ्यांनी देऊनही त्यांचे समाधान झालेले नाही. नांव लावण्याच्या कायदेशीरपणाबाबत लेखी खुलासा व्हावा, या मागणीबरोबरच मुंबई उच्च न्यायालयाच्या स्थगिती आदेशाच्या अनुषंगाने उपस्थित झालेले प्रश्न, संपादित जमिनीची नुकसान भरपाई, भूमी संपादनाचा कायदेशीरपणा या संदर्भातील कार्यवाहीच्या अनुषंगाने

मुख्यतः श्री.शाळू यानी विविध मागण्या केल्या आहेत. त्या प्रशासकीय कार्यवाहीच्या स्वरुपाच्या आहेत, तसेच जुन्या निवाड्यानुसार फेरफारात नाव दाखल केले आहे तो फेरफार चुकीचा आहे, असे श्री.शाळू यांचे म्हणणे आहे. पण तो दुरुस्त करण्याचे अधिकार तहसीलदारांचे आहेत, विशेष भूमी संपादन अधिकाऱ्यांचे नाहीत, हे श्री.शाळू यांना स्पष्ट केलेले आहे. तसे जन माहिती अधिकारी तथा विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१९ श्रीमती ऊंटवाल व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.चिंतामणी जोशी यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. मात्र कुळाचे नाव कायद्याच्या कोणत्या कलमान्वये लागले ही माहिती आपल्याला मिळाली नाही व ती मिळावी ही आपली मागणी कायम असल्याचे श्री.शाळू यांनी सांगितले. नेमक्या माहितीबाबतचा अर्ज श्री.शाळू यांनी नव्याने द्यावा व त्यानुसार विशेष भूमी संपादन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी १५ दिवसात श्री.शाळू यांना माहिती द्यावी, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिले.

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अपीलकर्त्याच्या नव्या अर्जानुसार १५ दिवसात माहिती देण्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा विशेष भूमी संपादन अधिकारी यांनी दि.३०.९.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.८.९.२००८**

सप्टेंबर-०८-५-७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि.२७.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९७६ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. कैलास हनुमंत भोरडे<br>सर्व्हे क्र.४७/२६, पर्वती, अरण्येश्वरनगर,<br>पुणे ४११ ००९ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, हवेली,<br>जिल्हाधिकारी पुणे कार्यालय आवार, पुणे १ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | नगर भूमापन अधिकारी क्रमांक २,<br>तहसीलदार पुणे कार्यालय आवार,<br>शुक्रवार पेठ, खडकमाळ, पुणे ४११ ००२ | हजर |

कसबे पुणे, ता.पुणे जिल्हा पुणे या शहराच्या महसुली भूमापन दर्शविणाऱ्या ग्रामनकाशांची मागणी अपीलकर्ता श्री. कैलास हनुमंत भोरडे यांनी केली होती. त्यापैकी काही भाग (तुकडा क्र.१ व ६) भूमी अभिलेख विभागाकडे उपलब्ध होते. मात्र इतर तुकड्यांच्या ( १ ते ४ व ७ ) प्रती अद्यापही श्री.भोरडे यांना प्राप्त झालेल्या नाहीत. सदर नकाशे उपलब्ध नाहीत, असे जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, हवेली, जिल्हाधिकारी पुणे कार्यालय आवार, पुणे १ यांनी कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्रमांक २, तहसीलदार पुणे कार्यालय आवार, शुक्रवार पेठ, खडकमाळ, पुणे २ यांनी तोच निर्णय कायम करुन अपील निकाली ठेवले. आपला आग्रह मुद्रित प्रतींचा नाही. छायांकित प्रती प्रमाणित करुन दिल्या तरी चालेल, असे श्री.भोरडे यांनी स्पष्ट केले.

सदरचे अभिलेख ७/१२ उताऱ्यांचे होते. ते आता (सिटी सर्व्हे झाल्याने) नगर भूमापन क्रमांनानुसार तयार झाले आहेत, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

वरील सर्व बाबी पाहता अभिलेख उपलब्ध न होण्याची कारणे स्पष्ट होणे गरजेचे आहे. सदरचे अभिलेख कायम जतन करण्याचे ('अ' वर्गातील ) असून त्यातील काही भाग उपलब्ध न होणे ही बाब मान्य करण्याजोगी नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य .
२. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित अभिलेख गहाळ होणेबाबत खाते अंतर्गत चौकशी सुरु करावी व दि.१५.१०.२००८ पर्यंत त्याबाबतचा अहवाल आयोगाला सादर करावा.

पुणे
दि. १९/०९/२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि ०८.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता

| अ क्र | अपिल क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९७९/ सोलापूर | श्री.अनिरूध्द नंदकुमार पिंगळे मु. पो. वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर | उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.२, अकलूज, ता.माळशिरस जि. सोलापूर | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज, ता.माळशिरस जि. सोलापूर | इंदापूर. अकलूज-सांगोला राष्ट्रीय महामार्ग ७१ वरील अतिक्रमणा बाबतची माहिती. | माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि. ६/१०/२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. |
| २ | ७५३/सोलापूर | श्री. मुकुंद डोगरी काटे रा. आवसे वस्ती, आमराई, सोलापूर | उपशिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, सोलापूर | शिक्षणाधिकरी (माध्य), जिल्हा परिषद, सोलापूर | सहयाद्री प्रशाले मधील शिक्षकांच्या सन २००५ पासून माहे ऑक्टोबर २००७ अखेर वैद्यकीय बाबतची माहिती. | माहिती मिळाल्याने अपील निकाली काढावे, असे अपीलकर्त्याने निवेदनात नमूद केले आहे. |
| ३ | ६२५/ सोलापूर | श्री. अ. रहिम नबीसाब उर्फ बाबु सागरी रा.मु. पो. पितापूर ता. अक्कलकोट जि. सोलापूर | ग्रामसेवक, मौजे पितापूर ता.अक्कलकोट, जि. सोलापूर | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि. सोलापूर | मौजे पितापूर येथील दारिद्रय रेषेखालील लोकांची यादी, मिळकतदारा-कडून करण्यात आलेल्या वसुली रकमा थकित करदाने यांची माहिती व ग्रामपंचायतीस | आयोगाकडे अपीलकर्त्याने अपील दाखल केल्यानंतर दि.१४.१२.२००७ रोजीच्या पत्रात प्रथम अपिलीय प्राधिकारी यास अपील निकाली काढण्याबाबत कळविले आहे. वास्तविक ही वस्तुस्थिती जन |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्राप्त रक्कम व खर्चाच्या बाबी याबाबतची माहिती. | माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणणे आवश्यक होते. तसे न केल्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे. |
| ४ | ७००/ सोलापूर | श्री. किशोर आनंतराव भागवत रा.२८६, रंभापूर विभाग, करमाळा जि. सोलापूर | ग्रामपंचायत रोपले (क), ता. माढा जि. सोलापूर | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कुर्डुवाडी. ता. माढा, जि. सोलापूर | एकूण ६ व्यक्तींचे जन्म व जातीचे दाखले. | माहिती प्राप्त झाल्याने आपली कोणतीही तक्रार राहिलेली नाही, असे अपीलकर्त्याने दि.३०.१२.२००७ रोजीच्या पत्रान[illegible] जन माहिती अधिकारी यांना कळविले ही वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणणे आवश्यक होते. तसे न केल्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. २८/.१०.२००८

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९९३ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. राजेंद्र विश्वनाथ शिंदे<br>फ्लॅट क्र.३०३, बिल्डिंग क्र.८, रक्षकनगर, फेज-२, नगर बायपास रोड, खराडी, पुणे-१४ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व महाराष्ट्र शासनाचे छायाचित्रण तज्ञ, पुणे-१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्र. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे-१ | हजर |

अपीलकर्ता श्री. राजेंद्र विश्वनाथ शिंदे यांनी दि. ५.३.२००७ चे अर्जान्वये नाव बदलण्याचे अर्ज रक्कमेबाबत ग्रंथागार विभागात झालेल्या भ्रष्टाचाराविषयी ग्रंथागार पर्यवेक्षकांनी केलेली टिप्पणी व त्यावरील प्र. व्यवस्थापकांचे झालेले आदेश मागणी केले होते.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आयोगास सादर केलेले दि. १४.१२.२००७ चे निवेदन पाहता मागणी केलेल्या प्रकरणांची संचिका/अहवाल दि. १३.३.२००७ रोजी मा. संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामुग्री यांना पाठविल्याचे नमूद आहे. प्रथम अपिलात अर्ज शुल्काची १०/- रू. फरक रक्कम न दिल्याने अपील चालविलेले दिसत नाही. दि. ११.७.२००७ रोजी अपीलकर्त्यास माहिती देऊ केल्याचे दिसून येते. वास्तविक पाहता जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती न देण्याचे कारण समजून येत नाही. अपीलकर्त्याच्या मागणीनुसार माहिती देण्यास दि. ११.७.२००७ रोजी त्यांनी अनुकूलता दाखविली. तत्पूर्वी माहिती न देण्याचे कारण दिसून येत नाही. तसेच दि. २७.६.२००८ रोजी माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास निःशुल्क माहिती तात्काळ देण्यात यावी. माहिती देण्यास विलंब झालेबाबत जन माहिती अधिकारी यांना कडक समज देण्यात येत आहे.

पुणे
दि. १० .९.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ